CNR No. MHLA060005302026

**फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.४१/२०२६ मधील नि.क्र.०१ वरील आदेश**

नागोर वि. शासन

प्रस्तुतचा अर्ज आरोपी अर्जदार नागोर पि. विठ्ठलराव शिखरे यांनी बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जातील मजकुर असा की, किनगाव पोलीसांनी गु.र.नं.५४/२०२६ मधील भारतीय न्याय संहितेचे कलम ३०३ (२), ३ (५) मध्ये त्यांचे मालकीचे टाटा कंपनीचा (हायवा टिप्पर) वाहन जिचा क्रमांक एम.एच. २६-सीएच-८०५६ असुन सदर गाडीचे वर्णन पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | :- | एम.एच.२६-सीएच-८०५६ |
| चेसिस नंबर | :- | MAT567009R3D11001 |
| इंजिन नंबर | :- | B6.7B62300D03142D64376905 |

२. सदर वाहन अर्जदार यांचे मालकीचे असुन व्यावसायिक वापरासाठी सदर वाहनाची गरज असते. करीता वाहनाचा ताबा मिळणेकरीता अर्ज केला आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली आहे. निशाणी ०५ कडे तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे नमुद गुन्हयात जप्त वाहन हे आरोपीस परत केल्यास तो याच प्रकारे चोरुन वाळू वाहतुक करण्याची शक्यता आहे म्हणून सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

४. अर्जदाराने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र दिलेले असुन, प्रथम खबरी अहवालाचे सत्यप्रत, वाहनाच्या आर.सी. टी.सी. बुकची सत्यप्रत, आधारकार्डची सत्यप्रत व इन्शुरन्स प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहे. आरोपी अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, पोलिसांनी जो टाटा टिप्पर जप्त केला आहे तो रामदास प्रल्हाद वानखेडे याच्या नावे नोंदणीकृत आहे. परंतु रामदास वानखेडे यांनी (निशाणी १०) कडे सदरचे वाहन नागोर विठ्ठलराव शिखरे यांना देण्यास त्यांची काही हरकत नाही असे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने (निशाणी ११) कडे वाहन विक्री करारनामा व जबाबदारी पत्र याची सत्यप्रत दाखल केली आहे. सदर करारनाम्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की रामदास प्रल्हादराव वानखेडे म्हणजेच वाहनाचा मुळ मालक याने नागोर विठ्ठलराव शिखरे म्हणजेच सदर अर्जातील अर्जदार यांना वाहन विक्री केली आहे.

५. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर टाटा टिप्पर पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर वाहन हे अर्जदाराच्या

ताबेकब्जात असलेबाबत अर्जदाराने आणि रामदास प्रल्हाद वानखेडे याने योग्य तो पुरावा दिला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटीवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांना किनगाव पोलीसांनी गु.र.नं.५४/२०२६ भारतीय न्याय संहीतेचे कलम ३०३ (२) व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ अन्वये अर्जदार यांचे मालकीचे टाटा ट्रक (हायवा टिप्पर) जिचा क्रमांक एम.एच.२६-सीएच-८०५६ हे निरक्षणग्राही बंधपत्र (अंतरिम ताबा) म्हणून रु.२०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) घेवुन ताबा देण्यात येतो.

३. सदर केसचा निकाल लागेपर्यंत सदर वाहनाचे मूळ स्वरुप, रंग बदलणार नाही अथवा कोणासही हस्तांतरित अथवा तबदिली करणार नाही तसेच या न्यायालयास आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त वाहन न्यायालयात हजर ठेवण्याचे अटींवर देण्यात यावी.

४. अर्जदार या न्यायालयाने अथवा या न्यायालयाची वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशावरुन उपरोक्त नमुद वाहन हजर करण्यास असमर्थ ठरल्यास रक्कम रु.२०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) या न्यायालयात भरण्यास पात्र राहील.

५. तपासीक अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी अर्जदाराच्या खर्चाने सदर जप्त वाहनाचे फोटो काढावे, फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व दोन पंचासमक्ष पंचनामा करुन तिच्या अंतरिम ताब्यात देण्यात यावा. सदर पंचनामा व फोटो न्यायालयात दाखल करावे.

६. अर्जदार यांनी स्वखर्चाने वाहनाचा मुळ नोंदणी क्रमांक वाहनावर लावावा. तपासीक अधिकारी यांनी वाहनाचा मुळ क्रमांक वाहनावर लावलेला आहे याची खात्री वाहन वाहन देतेवेळी करावी.

७. अर्जदाराने प्रस्तुतचे वाहनाची अद्ययावत विमाछत्र असल्याबाबतची पावती न्यायालयात दाखल करावी.

८. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.04.04 17:31:35 +0530

दि.२७.०३.२०२६

(एम.सी. हासगे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.०२) अहमदपूर.